**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले | अंक १० वा | शनिवार २७ मे २०२३ | पाने ४ | किंमत ४ रु/-
| Volume 1 | Issue 10 | Date : 27/05/2023 | blow :Saturday | Page 4 | Price 4

### राज्यातील सर्व जिल्हे द्रुतगती महामार्गाने जोडणार

# समृद्धी महामार्ग महाराष्ट्राचे भाग्य बदलणारा ठरणार : मुख्यमंत्री शिंदे




शिर्डी/राहुल फुंदे : हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गामुळे राज्याचे २४ जिल्हे जोडले जाणार आहेत. विकासाचा हा महामार्ग महाराष्ट्राचे भाग्य बदलणारा ठरणार आहे. डिसेंबर २०२३ पर्यंत समृद्धी महामार्गाचा शेवटचा टप्पा पूर्ण करण्यात येईल. त्याचबरोबर येत्या काळात राज्यात समृद्धी सारखे अनेक प्रकल्प राज्यात राबविण्यात येतील. राज्यातील सर्व जिल्हे द्रुतगती महामार्गाने जोडण्यात येतील. अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे दिली.

जेऊर कुंभारी (ता.कोपरगाव)

## समृद्धी महामार्गाच्या शिर्डी ते भरवीर (ता. इगतपुरी) या ८० किलोमीटर लांबीच्या दुसऱ्या टप्प्याचे लोकार्पण

शिर्डी पथकर प्लाझा येथे हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाच्या शिर्डी ते भरवीर (ता. इगतपुरी) या ८० किलोमीटर लांबीच्या दुसऱ्या टप्प्याचे लोकार्पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल,पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, खासदार सदाशिवराव लोखंडे, खासदार डॉ.सुजय विखे पाटील, आमदार राम शिंदे, आ.नरेंद्र दराडे, आ.मोनिका राजळे, राज्याचे मुख्य सचिव मनोज सौनिक, मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव ब्रिजेश सिंह, प्रधान सचिव श्रीकर परदेशी, नाशिक विभागीय आयुक्त राधाकृष्ण गमे, जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ आदी उपस्थित होते. यावेळी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाच्या कोनशिलेचे अनावरण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले.

मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले की, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना त्यांनी । **पान २ वर**

# यंदा पाऊस सर्वसाधारणच

## मोसमात सरासरीच्या ९६ टक्के



पुणे : नैऋत्य मोसमी पाऊस अंदमान-निकोबारपासून पुढे सरकण्यासाठी अनुकूल स्थिती असून तो ४ जूनपर्यंत केरळमध्ये दाखल होऊ शकतो. मात्र, यंदा जूनमध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता आहे, तर हंगामात सरासरीच्या ९६ टक्के पावसाचा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाने शुक्रवारी वर्तवला. भारतीय हवामानशास्त्र विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. डी. शिवानंद पै यांनी जूनचा पावसाचा अंदाज आणि मोसमी हंगामाच्या दीर्घकालीन सुधारित अंदाजाची माहिती शुक्रवारी ऑनलाइन पत्रकार परिषदेत दिली. सध्या नैऋत्य मोसमी वारे अंदमान-निकोबारजवळ आहेत. आता त्यांच्या पुढील प्रवासासाठी अनुकूल स्थिती असल्याने मोसमी पाऊस ४ जूनपर्यंत केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता असल्याचे डॉ. पै यांनी सांगितले.

देशभरात पूर्वमोसमी पाऊस चांगला झाला. एकंदर सरासरीपेक्षा १२ टक्के अधिक, तर मेमध्ये सरासरीपेक्षा ८ टक्के अधिक पाऊस पडला. ईशान्य भारतात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला. तसेच देशभर कमाल आणि किमान तापमान सरासरीपेक्षा कमी नोंदवले गेले. देशातील काही ठिकाणी उष्णतेच्या लाटांची नोंद झाली. मात्र गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा उष्णतेच्या लाटांचे प्रमाण कमी होते.सध्या 'एल निनो' या घटकासाठी अनुकूल स्थिती आहे. त्यामुळे पावसाळ्यात 'एल निनो' हा घटक सक्रिय होऊन ती स्थिती हिवाळ्यापर्यंत राहू शकते. तसेच हिंदू महासागरातील 'इंडियन ओशन डायपोल' (आयओडी) हा घटक पावसाळ्यात सक्रीय होईल. 'एल निनो'मुळे पावसावर परिणाम होत असला, तरी 'इंडियन ओशन डायपोल' सक्रिय झाल्याने तो परिणाम भरून निघेल. यापूर्वी १९९७मध्ये अशी स्थिती निर्माण झाली होती, असे डॉ. पै यांनी नमूद केले.

अरबी समुद्रातील पश्चिम ध्रुव (पश्चिम हिंदी महासागर) आणि इंडोनेशियाच्या दक्षिणेकडील पूर्व हिंदी महासागराचा पूर्व ध्रुव यांच्या पृष्ठभागाच्या तापमानातील फरक म्हणजे 'हिंदी महासागर द्विध्रुव'(इंडियन ओशन डायपोल-आयओडी). सध्या 'आयओडी' निष्क्रिय आहे, मात्र पावसाळ्यात तो सक्रिय होऊन 'एल निनो'चा परिणाम भरून काढील, असा अंदाज आहे.

## संसदेच्या नव्या इमारतीच्या उद्घाटनाचा वाद, याचिका फेटाळली

नवी दिल्ली: नवीन संसद भवनाचे उद्घाटन राष्ट्रपतींनी करावे अशी मागणी करणारी जनहित याचिका सुप्रीम कोर्टाने फेटाळली आहे. कलम ८५ नुसार राष्ट्रपती या संसदेचं सत्र बोलवतात. तसेच ८७ नुसार त्याचं संसदेत अभिभाषण देखील होतं. ज्यामध्ये राष्ट्रपती दोन्ही सदनांना संबोधित करतात. तसेच संसदेमधील सगळी विधेयकं ही राष्ट्रपतींच्या मंजुरीनेच कायदेशीर केली जातात. त्यामुळे राष्ट्रपतींच्या हस्ते या नव्या संसद भवनाचं उद्घाटन करण्यात यावं, अशी मागणी याचिकेद्वारे करण्यात आली होती. याचिकेवर आज (२६ मे) सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. या याचिकेची सुनावणी न्यायमूर्ती जे.के. माहेश्वरी आणि पी.एस. नरसिम्हा यांच्या सुट्टीतील खंडपीठासमोर होणार होती. परंतु ही याचिका न्यायालयाने दाखलही करून घेतली नाही. सी.आर. जयसुकिन नावाच्या वकिलाने ही याचिका दाखल केली होती. दरम्यान नवीन संसद भवनाचे उद्घाटन २८ मे रोजी होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी २८ मे रोजी नवीन संसद भवनाचे उद्घाटन करणार आहेत. राष्ट्रपतींऐवजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नव्या संसदेचं उद्घाटन होणार असल्याने या कार्यक्रमावर विरोधी पक्षांनी बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे.

## कामगारांची पारदर्शकतेने नोंदणी करून, शासकीय योजनांचा गतीने लाभ द्यावा : कामगार मंत्री डॉ.खाडे

### कामगार भवन, कामगारांसाठीच्या दवाखान्यासाठी जागा पाहणीचे निर्देश

सोलापूर/प्रतिनिधी: जिल्ह्यामध्ये बांधकाम कामगारांची नोंदणी प्राधान्याने, पारदर्शकतेने व गतीने करा. सर्व घटकांतील कामगारांची नोंदणी करा व कामगारांसाठी असणाऱ्या सर्व योजनांचा लाभ त्यांच्यापर्यंत त्वरेने पोहोचवा, असे निर्देश कामगार मंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी आज येथे दिले.कामगार विभागाच्या बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी सहाय्यक कामगार आयुक्त सुधीर गायकवाड, सरकारी कामगार अधिकारी विलास गायकवाड, नोंदणी अधिकारी ए. जी. पठाण, माजी महापौर श्रीकांचना यन्नम आदि उपस्थित होते.



कामगार मंत्री डॉ. सुरेश खाडे म्हणाले, शासनाने प्रत्येक जिल्ह्यात कामगार भवन बांधण्याची मोहीम हाती घेतली आहे. सोलापूर जिल्ह्याचे कामगार भवन बांधण्यासाठी जागा पाहणी करावी. ईएसआय हॉस्पिटलच्या धर्तीवर कामगारांसाठी दवाखाना उभारण्यासाठी एमआयडीसीमध्ये जागा उपलब्धतेसाठी जिल्हाधिकारी यांनी पुढाकार घ्यावा. तसेच, नाक्यावरच्या बांधकाम कामगारांसाठी निवारा शेड उभारावेत, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले. कामगार मंत्री डॉ. सुरेश खाडे म्हणाले, इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ अंतर्गत बांधकाम कामगारांसाठी असणाऱ्या सर्व योजनांचा लाभ तळागाळातील बांधकाम कामगारांपर्यंत । **पान २ वर**

## संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा निर्विघ्न पार पाडण्यासाठी प्रशासनाने सज्ज रहावे : पालकमंत्री शंभूराज देसाई



सातारा : संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा निर्विघ्न पार पाडण्यासाठी प्रशासनाने सज्ज रहावे, अशा सूचना पालकमंत्री शंभुराज देसाई यांनी दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे पालखी सोहळा विषयी आढावा बैठक संपन्न झाली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी रूचेश जयवंशी, मुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानेश्वर खिलारी, पोलीस अधीक्षक समीर शेख, अपर जिल्हाधिकारी । **पान २ वर**

# आमदार सचिन कल्याणशेट्टीमुळे अक्कलकोट तीर्थक्षेत्राचा चेहरा बदलणार

## केंद्राच्या प्रसाद योजना सोबत मतदार संघातील ग्रामीण तीर्थक्षेत्रांना देखील निधी मिळण्यात यावे

अक्कलकोट/प्रतिनिधी: तीर्थक्षेत्र अक्कलकोट शहराकरीता ३६८ कोटी रुपयांचे विकास आराखड्याला शासनाने अतिंम मंजुरी दिली. अनेक काम त्यामध्ये असले तरी दोन्ही पालखी मार्गाचे काम अत्यंत महत्त्वाचे असणार आहेत. कारण याकामासाठी शासनाला तब्बल ४०० प्रॉप्रटीचे भूसंपादन करावा लागणार आहे. याचाच खर्च सर्वात मोठा आहे.याकरिता किमान २०० कोटी रुपये लागणार आहे. सन १९७२ च्या मास्टर प्लॅनला सत्यात उतरणे साठी तब्बल ५ दशकांनी मुहूर्त लागला आहे.


आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील शहरे, गावे, वाड्या, वस्त्या, तांडे यांच्या सर्वांगीण विकासाकरिता भरभरून निधी आणलेले आहेत. अजून आणता येत, याबरोबरच अक्कलकोट तालुक्याला उजनीचे हक्काचे पाणी मिळण्याकरिता एकरुख जलसिंचन योजना व देगाव एक्सप्रेस कालवा या दोन्ही योजना म्हणजे



तालुक्याच्या हरित क्रांतीचे स्वप्न पूर्ण करणे आहे. याकरिता पंतप्रधान सिंचाई केंद्रीय योजनेसह राज्य सरकारकडून निधी उपलब्द करून द्यावी यासह नुकतेच अक्कलकोटला राज्य शासनाकडून भरभरून निधी मिळाला आहे.त्याप्रमाणे मैंदर्गी येथील श्री शिवचलेश्वर, दुधनी येथील श्री सिद्धरामेश्वर या श्रीस्थळांना देखील तीर्थक्षेत्र विकास निधी मिळावा, याबरोबरच मतदार संघातील ग्रामीण तीर्थक्षेत्रांना देखील भरघोष निधी मिळून द्यावा, श्रीक्षेत्र अक्कलकोटला राज्य शासनाच्या निधी मिळाला आहेच, आता केंद्राच्या प्रसाद योजनेत देखील समावेश करून तिथलाही भरघोष निधी आमदार कल्याणशेट्टी हे मिळवून देतील असा ठाम विश्वास मतदार संघातील जनतेतून निर्माण झाला आहे.

श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील भविष्यातील भाविकांची वाढती गर्दी व शहराचे विस्तार याचे विचार करून मागील ५ दशकांनी मेन रोडचे मास्टर प्लॅन व पालखी मार्गाचे विस्तार करणे कामी आरक्षण टाकण्यात आले होते. दुर्दैवाने आजवर त्या विकास कामाला राजकीय इच्छाशक्ती अभावी योग्य मुहूर्त लागले नव्हते. यामुळे भविकाना विविध अडचणीना तोंड देत पालखी सोहळा ,गणपती विसर्जन मिरवणूक आशा विविध धार्मिक कार्यक्रम साजरा करावा लागत होते. सदर आराखड्यात वाहनतळ, रस्ता रुंदीकरण व आवश्यक त्या भुसंपादन, वॉटर एटीएम, शौचालय निर्मिती, हत्ती तलाव उद्यानांचा विकास, व्यापारी केंद्र, भक्त निवास, चौक सुशोभीकरण, विधुतिकरण असे बरेच कामाचे समावेश आहेत. यामध्ये सर्वात खर्चिक व वेळखाऊ काम हे पालखी मार्गाचा असणार आहे. यासाठीच एकूण मंजूर निधी पैकी निम्याहून अधिक निधी खर्च करावा लागणार आहे. पालखी मार्ग वगळता उर्वरीत कामे गरजेनुसार टप्याटप्याने न प च्या जागेत करण्याचे प्रशासनाचे नियोजन आहे.

**दोन पालखी मार्ग :(मास्टर प्लॅन)-** सन १९७२ मध्ये मास्टर प्लॅन नगरपालिकेने तयार केले असले तरी शासनाने सुचविलेल्या सूचनेवरून वेळोवेळी त्यात दुरुस्ती करणेत आले आहे. सुधारित प्लॅन २०१२ मध्ये जाहीर करण्यात आले आहे. स्वामी समर्थ मंदिराच्या दक्षिण महाद्वार ते मुरलीधर मंदिर, फत्तेसिह चौक, तूप चौक ,कापड बाजार मेन रोड, कारंजा चौक, मार्गे समाधी मठ ते ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन मंदिर पर्यंत असे आहे. हा मार्ग १२ मीटर रुंदीचे, ८५० मीटर लांबीचे असणार आहे. सध्या २५ ते २८ फुटाचे रस्ता अस्तित्वात असून आणखीन दोन्ही बाजूने मिळून १० फुटाचा । **पान २ वर**



## ✻ सुविचार ✻

शिक्षण म्हणजे मानवाच्या अंगी जे सुप्त पूर्णत्व आहे, त्याचेच प्रकटीकरण होय.- स्वामी विवेकानंद

## संपादकीय

# तर योग्य सन्मान व्हावाच...

उद्या म्हणजे २८ मे रोजी नवीन संसद भवनचे उद्घाटन होणार आहे. देशासाठी हा एक महत्त्वाचा कार्यक्रम असणार आहे. नवे संसदभवन बांधण्याची इतक्यात गरज होती काय वगैरे वाद यापूर्वीच होऊन गेले आहेत. आता नवीन भवन बांधूनही झाले आहे. आता त्या सोहळ्यात सर्वच राजकीय पक्षांनी आनंदाने उपस्थित राहून या भवनातून लोककल्याणासाठी सुसंवादाने संसदीय कामकाज होईल याची ग्वाही द्यायला हवी होती, पण आता या वास्तूचे उद्घाटनही एका नवीन वादात अडकले आहे. नव्या संसदभवनाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी करणार आहेत, पण हे उद्घाटन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते व्हावे, अशी मागणी पुढे आली आहे. सुरुवातीला राहुल गांधी यांनी ही मागणी केली. त्याला अन्यही राजकीय पक्षांचा पाठिंबा मिळू लागला आहे. ही मागणी जसजशी जोराने पुढे केली जाऊ लागली आहे, तसतशी काँग्रेस, आम आदमी पक्षासोबतच आता ठाकरे गटानेही या कार्यक्रमावर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला आहे. तसा भाजपच्या नेत्यांचाही धीर सुटू लागला असून त्यांनीही काँग्रेससह संबंधित पक्षांवर आगपाखड करणे सुरू केले आहे. संसद अधिवेशनाच्या कामकाजात नियमितपणे जो राजकीय गदारोळ होतो तो आपण वारंवार अनुभवत असतो. संसदीय लोकशाही प्रक्रियेत राष्ट्रपती पद हे सर्वोच्च असते. त्यामुळे नवीन संसदभवनाचे उद्घाटन प्रोटोकॉलप्रमाणे राष्ट्रपतींच्याच हस्ते व्हावे, अशी जर मागणी पुढे येत असेल तर त्यावर विचार करण्यात सरकारला काही अडचण येण्याचे कारण नाही. या भवनाचे भूमिपूजन मोदींच्याच हस्ते झाले आहे. या भवनावर जे राजचिन्ह लावले जाणार आहे, त्याचे अनावरणही मोदींनी एकट्यानेच केले आहे. आता निदान मुख्य भवनाच्या उद्घाटनाचा कार्यक्रम देशाच्या घटनात्मक प्रमुखांच्या हस्ते व्हावा, अशी मागणी पुढे येत असेल तर मोदींनीच ती खुल्या दिलाने मान्य करून आपल्यातील एका वेगळ्या व्यक्तित्वाचा परिचय दिला पाहिजे. पण ही बाब त्यांच्या कितपत पचनी पडेल हे सांगता येत नाही. किंबहुना सगळा शो एकट्याच्याच सहभागाने करण्याचा त्यांचा सुरुवातीपासून जो प्रयत्न दिसून आला आहे, तो पाहता मोदी ही मागणी सहज मान्य करण्याची शक्यता कमी आहे. ही नवीन वास्तू मोदींच्याच पुढाकाराने उभी राहिली आहे, हे साऱ्या देशाला मान्य आहे. उद्या राष्ट्रपतींच्या हस्ते त्याचे उद्घाटन झाले तर पंतप्रधान म्हणून मोदींचे क्रेडिट कमी होईल, असे कोणीच म्हणणार नाही. मोदींनीही हा वाद सामंजस्याने टाळण्याचा प्रयत्न करून राष्ट्रपतींना प्रोटोकॉलप्रमाणे योग्य तो सन्मान दिला पाहिजे.

# रमाईला वाचुन रडायचे नाही लढायचे....

रमाई अर्थात संघर्ष व त्याचे प्रतीक. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जिवनातील सर्वात मोठा आधार म्हणजे रमाई. रमाई हे नाव नाही तर संघर्ष आणि त्यागातून जनकल्याण कसे साधता येते याची व्यवस्था म्हणजे रमाई होय. काबाड कष्ट करून, कुटूंबाची जबाबदारी स्विकारून कुटुंबाच्या सुखासाठी झटत राहणे. कुटुंबातील अनेक सदस्यांचे मृत्यू स्वतः च्या डोळ्यांनी बघणे, आणि नवरा काही तरी चांगले काम करतोय, त्यांना कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण होऊ नाही म्हणून स्वतः ची मुले स्वतः च्या हाताने मातीत गाडून करोडो मुलांचे जिवन उज्वल करणारी रमाईचे मन असेल तरी केवढे याचा विचारही करू शकत नाही. जगातील सर्वात विद्वान व्यक्तीची बायको, आमदार, बॅरिस्टर यांची बायको, ज्यांना भेटायला राजर्षी शाहु महाराज चाळीत भेटायला येतात अशा गुणवान व्यक्तीची बायको, निरक्षर होती पण अशिक्षित नव्हती. विषमतेचे चटके हा समाज सहन करतोय, आणि यातून बाहेर काढण्यासाठी बाबासाहेब शिकत आहेत, मेहनत घेत आहेत म्हणून रमाईने स्वत:च्या इच्छा मारल्या, गौऱ्या थापून घर चालविले, त्यातून उरलेल्या पैसे बाबासाहेब आंबेडकर यांच्या कामी येतील म्हणून जपुन ठेवून बाबासाहेब आंबेडकर यांना दिले. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पैसे कमावायला लागल्या नंतरही कोणताही हट्ट न करता बाबासाहेब आंबेडकर यांना बळ देण्याचे काम रमाईने केले. समाईचा एकुणच संघर्ष, त्याग आणि समजूतदार पणा बघुन आजही आपल्या डोळ्यात पाणी येते. आयुष्य भर अत्यंत आर्थिक गरीबीमध्ये जिवन जगणाऱ्या रमाईच्या मनाची श्रीमंती आपण कोणत्याही मापात मोजली जाऊ शकत नाही. म्हणून स्वतः च्या अंगावर साधे लुगडे, गळ्यात काळा मनी यातच जिवन काढलेल्या रमाई मुळे करोडो महिलांच्या अंगावर हजारो रुपयांची साडी आणि आणि सोन्याच्या ताईत रमाई बसली हे केवळ आणि केवळ रमाईचा त्याग, संघर्ष व बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याप्रती असलेला विश्वास. वरिल सर्व गोष्टी सर्वांना माहिती आहेत. रमाईचा त्याग, त्यांनी कसे जिवन जगले, बाबासाहेब यांच्या पाठीशी कशा उभ्या राहील्या, बाबासाहेब आंबेडकर यांच्या आधार कशा झाल्या, आणि रमाईने जर बाबासाहेब आंबेडकर यांना थोडे जरी अडवले असते तर कदाचित बाबासाहेब आंबेडकर यांनी ठरलेले ध्येय पुर्ण झाले नसते. यातून आपल्या लक्षात येते कि रमाई अडाणी असली तरीही तिच्या ऐवढे जाणकार,. सुशिक्षित व समजदार आज कोणी असेल? हा खुप मोठा प्रश्न आहे. रमाईचा संघर्ष व त्याग बघुन रडू येते हे साहजिकच आहे. परंतु फक्त रडल्याने रमाईला आपण मानतो किंवा रमाई समजली असे मुळीच नाही. रमाईने संघर्ष व त्याग कशासाठी केला तर देशातील करोडो लोकांना समता, बंधुता, स्वातंत्र्य व न्याय मिळावा, माणसिक गुलामी तोडून प्रत्येकाला मान सन्मान स्वाभिमान मिळून माणसाला माणसाची वागणूक मिळावी. विषमेतेची व अस्पृश्यतेची व्यवस्था नष्ट करून समता प्रस्थापित होऊन प्रत्येकाला आदर्श जगण्याचा अधिकार मिळावा आणि करोडो लोकांच्या उद्धाराचे द्वार उघडून तेथे प्रत्येकाला जाण्याची संधी मिळावी म्हणून रमाईने संघर्ष



केला, त्याग केला. परंतु मुख्य मुद्दा हा आहे की, रमाईच्या त्याग,.संघर्षाच्या मुळे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी जे काही निर्माण करून ठेवले. सोन्याचे दिवस आपल्याला मिळाले, हक्क अधिकार मिळाले ते आज संरक्षित आहेत का? डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना लिहून दिली आणि घटना कोणीच बदलु शकत नाही असे जर वाटत असेल तर आपण गुलामीगीरीमध्ये फसलो हे लक्षात घेणे आवश्यक आहे. चार मुल त्यागुन, स्वतः उपाशी राहुन, स्वतः च्या पगारातील पैसा लोकांच्या हितासाठी खर्च करून उभी केलेली व्यवस्थेला सुरूंग लागत आहे. रमाई अडाणी असताना समतावादी व्यवस्था निर्माण करायला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना सर्वोतोपरी सहकार्य केले. त्याचमुळे बाबासाहेब आंबेडकर हि एवढी मोठी व्यवस्था निर्माण करून हजारो वर्षापासून चालत आलेली गुलामगिरी व विषमता नष्ट करून हक्क अधिकार बहाल करून माणसाला माणुस बनवले. आणि आज तीच व्यवस्था नष्ट करण्यासाठी शत्रु रांत्रदिवस प्रयत्न करत आहेत. आणि आजच्या शिकलेल्या स्त्रिया, नोकरदार स्त्रिया, नोकरी वाल्यांच्या स्त्रिया पैशाच्या जोरावर आम्हाला आज कोणतीच समस्या नाही असे समजत आहेत. हे सुद्धां गुलामीचेच लक्षण आहे. बाबासाहेब आंबेडकर यांना १९२२ नंतर कोणतीही वैयक्तिक अडचण नव्हती, पैसा, नोकरी मानसन्मान सर्व गोष्टी होत्या. तरीही ते लढले करोडो लोकांचे कल्याण केले तेच बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले काम आज धोक्यात आहे. संविधान धोक्यात आहे, शिक्षण, आरक्षण व नोकरी धोक्यात आहे. आमचे हक्क अधिकार धोक्यात आहेत. आणि हे सर्व वाचवण्यासाठी महिलांनी लढणे आवश्यक आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचीही ईच्छा होती महिलांनी आंदोलनामध्ये सक्रिय सहभागी होणे आवश्यक आहे. मोफत व सक्तीचे शिक्षणाची तरतूद असताना लाखों करोडो रुपये शिक्षणावर खर्च होत आहेत. लाखो करोडो रुपये खर्च करून नोकरी नाही मग शिक्षण कशासाठी? हा प्रश्न उपस्थित होऊन बरेच लोक शिक्षणापासून दुर जातील. म्हणजेच बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला शिक्षणाचा अधिकार आपोआप बंद होईल. नोकरीचे खाजगीकरण करून आरक्षण व नोकरी संपवली आहे. खाजगीकरणामध्ये समोरच्या व्यक्तीची इच्छा असेपर्यंत आपण नोकरी करू शकू. ना पेन्शन ना कामाची शाश्वती ना इतर सुखसुविधा. म्हणजे बाबासाहेब आंबेडकर यांनी नोकरी,पेन्शन इतर लाभाची गॅरंटी संविधानाच्या माध्यमातून दिली ते ही गेले. आणि खाजगीकरणामध्ये आरक्षण नसल्याने उच्च पदे हे उच्च वर्णीय लोकांकडे जातील व चतुर्थ श्रेणी आपल्या कडे येईल म्हणजे पुन्हा आधुनिक मनुस्मृतीच लागु होईल. धर्माच्या नावाखाली पाखंड, अंधश्रद्धा, बुवाबाजी खुलेआम सुरू आहे, त्याला सरकार संरक्षण देत आहे. परंतु पाखंड, अंधश्रद्धा, बुआबाजी कायद्याने बंद असूनही त्याविरोधात बोलणाऱ्यांवर कारवाई केली जाते, बऱ्याच वेळा धर्मांध लोकांकडु धमक्या मिळतात म्हणजे आमचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य धोक्यात आहे. त्यांचे ते तर्क, पुरावा नसलेले, काल्पनिक अज्ञान पसरवत आहेत आणि आमच्या कडे पुरावे, तर्क व सत्य बाजु असूनही आम्ही ते छातीठोकपणे सांगु शकत नाही हे अभिव्यक्ती स्वातंत्र्य हिराऊन घेतल्याचे लक्षण नाही तर काय आहे? इतर धर्माच्या धार्मीक भावना दुखवू नाही म्हणून देव अंधश्रद्धा यावर न बोलण्याचे सल्ले दिले जातात, यावेळी आम्ही हेच विसरून जातो आमचाही धम्म आहे. तो विज्ञानावर आधारित आहे, कोणत्याही प्रकारच्या काल्पनीक कथांवर वा दैवशक्ती वर अवलंबून नाही असा आमचा धम्म अंधश्रद्धा, दैविशक्ती व इतर थोतांड नाकारतो परंतु इतर धर्माचे लोक जेव्हा देवाला सार्वजनिक करतात, सरकारी कामामध्ये देव, अंधश्रद्धा, पाखंड आणतात तेव्हा आमच्या ही भावना दुखतात याचा विचार कोणी करतो का? काल्पनिक गोष्टी मानणाऱ्यांनाच भावना आहेत आणि सत्य माणणाऱ्यांच्या भावनेचा विचार होणार की नाही? असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. आणि याचे कारण आहे, आम्ही रमाईचा इतिहास वाचून, बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची जाणीव न ठेवता कोणताही एकत्रितपणे लढा उभा न करता भौतिक सुखामध्ये गुरफटून गेलो. आम्हाला काहीच समस्या नाहीत या भ्रमात राहून पुन्हा सर्वांसाठी समस्या निर्माण झाल्या. भिमजयंती, रमाई जयंती फक्त साजरी करून त्यांचे विचार सांगणे आज महत्त्वाचे नाही तर त्यांचा लढा मजबूत करणे महत्त्वाचे आहे. आंबेडकरवादी विचाराच्या नावाखाली स्वतः चे पोट भरणाऱ्यांना एकाछता खाली आणुन आपल्या लढणे आवश्यक आहे. मीच नेता, मीच विचारवंत ह्या गोष्टी बाजूला सारून बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी म्हणून काम करने आवश्यक आहे. आपल्या कामावर जनता ठरवेल कोण नेता आणि कोण विचारवंत. स्वतः स्वतः ची पाठ थोपटने, प्रस्थापितांची लाचारी करून दोन पैसे मिळतील म्हणून हातमिळवणी करणे, आंबेडकरवादी विचारांचा लिलाव करणे हे थांबले पाहून. स्वतः ला बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी समजून शत्रुसमोर नतमस्तक होऊन लाचारी करणारा बाबासाहेब आंबेडकर यांचा अनुयायी असुच शकत नाही. कारण आजचे हे सोन्याचे मानासन्माचे दिवस बघण्यासाठी किती मोठा संघर्ष व त्याग आहे याची जाणीव आपल्याला राहली नाही. चार मुल समाजासाठी गमावलेल्या रमाईचे मन कुठे असेल. आपल्या बाळाला थोडा ताप जरी आला तर चांगल्या दवाखान्यात उसने पेसे घेऊन आपण दाखल करतो. जोपर्यंत बाळाला बरे वाटतं नाही तोपर्यंत आईला चैन पडत नाही. मग थोडा विचार करा रमाईने काय आणि कसे भोगले असेल? म्हणून रमाईच्या संघर्ष व त्यागाला खरचं नमन करायचे असेल तर एकीकरणासाठी, संविधानाच्या संरक्षणासाठी, हक्क अधिकारासाठी, नेतेगीरी, मी पणा मातीत गाडून समतेचा व न्यायाचा लढा उभा करणे आवश्यक आहे. आणि यामध्ये महिलांनी पुढाकार घेतला तर लढा लवकर उभा राहील आणि खऱ्या अर्थाने रमाईला तिच सर्वात मोठी आदरांजली ठरेल.

करोडो मुलांची आई रमाई यांच्या स्मृतीदिना निमित्त रमाई च्या त्यागाला, संघर्षाला व समजूतदार पणाला विनम्र अभिवादन..

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव ता. मेहकर**
**मोबा: ९१३०९७९३००**

पान १ वरुन

# समृद्धी महामार्ग महाराष्ट्राचे भाग्य..

जे स्वप्न पाहिले होते त्या स्वप्नांची समृद्धीच्या रूपात पूर्तता झाली आहे. विक्रमी वेळेमध्ये जमीन अधिग्रहण करण्यात आले. शेतकऱ्यांना आरटीजीएसच्या माध्यमातून मोबदला रक्कम देण्यात आली. सर्व अडथळ्यांवर मात करून हा प्रकल्प पूर्ण करण्यात आला. विकासाच्या या महामार्गामुळे राज्याच्या कृषी, उद्योग व पर्यटनाला निश्चितच वाव मिळणार आहे. असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.

समृद्धीसारख्या रस्त्यांचे जाळे निर्माण करणे काळाची गरज आहे. समृद्धीत आंतरराष्ट्रीय दर्जाचे १३ कृषी प्रकल्प साकार होणार आहेत. समृद्धी सोबत नागपूर ते गोंदिया या महामार्ग प्रकल्प साकार होणार आहे. नागरिकांना सरकारी कार्यालयाचे हेलपाटे मारावे लागू नये यासाठी 'शासन आपल्या दारी' मोहीम राबविण्यात येत आहे. याचा हजारो नागरिकांना फायदा होत आहे. शेतकऱ्यांना नमो शेतकरी योजनेच्या माध्यमातून वार्षिक १२ हजार रूपयांची मदत करण्यात येत आहे. लेक लाडकी योजनेतून मुलींच्या भविष्यासाठी शासनाने तरतूद केली आहे. शिर्डी विमानतळाच्या ६०० कोटींच्या प्रस्तावित टर्मिनल इमारतीचे भूमिपूजन जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात करण्यात येईल. अशी घोषणा मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्याचा विकास करायचा असेल तर विकासात मागास असलेला भाग मुंबई व पोर्टशी जोडणे अत्यंत आवश्यक होते. समृद्धी महामार्ग राज्याचा आर्थिक कॅरिडॉर ठरणार आहे. यामुळे राज्यातील १५ जिल्ह्यांचे भाग्य बदलणार आहे. ७०१ किलोमीटर महामार्गाची उभारणी विक्रमी अशा ९ महिन्याच्या कालावधीत पूर्ण होणारा समृद्धी हा देशातला एकमेव महामार्ग आहे. महामार्गासाठी केलेल्या भूसंपादनाचा शेतकऱ्यांना विक्रमी मोबदला देण्यात आला. पुढील सहा महिन्यात समृद्धी प्रकल्प पूर्ण करण्यात येईल. महामार्गावर वाहन चालकांनी वाहन चालवितांना वेग मर्यादा पाळावी. असे आवाहनही उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी केले.

समृद्धी महामार्ग, ट्रान्स हॉर्बर लिंक रोड, कोस्टल रोड सारख्या प्रकल्पाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील पायाभूत सुविधा बळकट होणार आहेत. नागपूर ते गोवा, मुंबई ते गोवा या महामार्गामुळे येत्या काळात महाराष्ट्राचे चित्र बदलण्यास मदत होणार आहे. महाराष्ट्राच्या सर्वसामान्यांच्या जीवनात परिवर्तन घडविण्याचे काम शासन करत आहे. असा विश्वास उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.महसूलमंत्री श्री.विखे पाटील म्हणाले की, समृद्धी महामार्गामुळे शिर्डी व परिसराच्या विकासाला चालना मिळणार आहे. रोजगाराच्या संधी मिळणार आहेत. यामुळे हा परिसर मुंबई, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भाशी जोडला जाणार आहे. समृद्धीच्या भूसंपादनासाठी शिर्डी व परिसरातील शेतकऱ्यांनी सहकार्य केले. शिर्डी विमानतळाच्या ६०० कोटींच्या टर्मिनल इमारतीमुळे विमान फेऱ्या वाढणार आहेत.

समृद्धी महामार्ग दुसऱ्या टप्प्याची वैशिष्ट्ये –

समृद्धी महामार्गाच्या दुसऱ्या टप्प्यात ७ मोठे पूल, १८ छोटे पूल, वाहनांसाठी ३० भुयारी मार्ग, हलक्या वाहनांसाठी २३ भुयारी मार्ग, ३ पथकर प्लाझावरील तीन इंटरचेंज, ५६ टोल बूथ, ६ वे ब्रिज आदी सुविधांचा समावेश आहे. शिर्डी ते इगतपुरी तालुक्यामधील भरवीर पर्यंतचे काम पूर्ण झाले आहे. प्रकल्पाच्या या दुसऱ्या टप्प्याचा खर्च ३२०० कोटी रुपये असून लांबी ८० कि मी आहे. दुसऱ्या टप्प्यात आजपासून ७०१ कि.मी पैकी आता एकूण ६०० कि.मी लांबीचा समृद्धी महामार्ग वाहतुकीस खुला झाला आहे.

# कामगारांची पारदर्शकतेने नोंदणी

पोहोचवावा. राज्य शासनाच्या शासन आपल्या दारी अभियानांतर्गत बांधकाम व अन्य सर्व कामगारांच्या नोंदणीला व योजनांच्या लाभवाटपाला प्राधान्य द्यावे, असे सूचित करून, मंत्री डॉ. खाडे यांनी विडी कामगार, यंत्रमाग कामगारांची नोंदणी होण्याच्या दृष्टीने केंद्र शासन स्तरावरून प्रयत्न केले जातील. कामगार घरकुल योजनेसाठी प्रस्ताव सादर करावेत, त्याला मंजुरी देण्यात येईल, असे स्पष्ट केले. यावेळी त्यांनी कामगार विभागाच्या योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला व त्यांच्या अडचणींचे निराकरण करण्याच्या दृष्टीने सूचना दिल्या.

# आमदार सचिन कल्याणशेट्टीमुळे

भूसंपादन करावा लागणार आहे. यासाठी किमान २०० प्रॉपटी बाधित होणार आहेत.

दुसरा मार्ग:– मंदिराच्या उत्तर महाद्वार ते गुरू मंदिर, राम गल्ली, मधला मारुती, सुभाष गल्ली, दावल बँड ते कारंजा चौक मार्गे समाधी मठ असा दुसरा पालखी मार्ग असणार आहे. ९ मीटर रुंदीचा, ६०० मीटर लांबीचा असून सध्या २२ फुटाचा रस्ता अस्तित्वात आहे. दोन्ही बाजूने मिळून ८ फुटाचा भूसंपादन करावा लागणार आहे. १२५ ते १५० प्रॉपर्टी बाधित होणार आहे.

कामात प्राधान्य क्रम ठरवून त्याचे अंदाज पत्रक तयार करून तांत्रिक मान्यतेसाठी शासनाकडे सादर करणार आहोत. मान्यता मिळताच कामे सुरू करू. यासाठी किमान दीड ते दोन महिने लागतील. यासाठी दुसऱ्या दिवसापासूनच संमधीत अधिकारी, कर्मचारी गतीने कामाला लागलो आहोत. सदर कामाचे स्वरूप ठरवून, प्राधान्य क्रम देऊन टप्याटप्प्याने सर्व कामे वेळेत मार्गी लागतील. यामाध्यमातून शहराचा चेहरामोहरा बदलू. जेणेकरून स्वामी भक्तांना पुरेसा सोईसुविधा उपलब्द होणार आहेत.

सदर आराखड्यात वाहनतळ, रस्ता रुंदीकरण व आवश्यक त्या भुसंपादनाला मंजुरी देण्यात आली आहे. वॉटर एटीएम, शौचालय निर्मिती, हत्ती तलाव उद्यानांचा विकास, व्यापारी केंद्र, भक्त निवास, चौक सुशोभीकरण, विधुतिकरण, असे अनेक कामांचा समावेश आहे. सन १९९७ मध्ये श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या दर्शनासाठी भक्तांची वाढती गर्दी लक्षात घेऊन तत्कालीन आ. कै बाबासाहेब तानवडे यांच्या प्रयत्न अंती तीर्थक्षेत्र दर्जेला मंजुरी मिळाली. त्यानंतर याकडे कोणीच गाभीर्याने पाहिले नव्हते, म्हणून विकास निधी म्हणावं तसं मिळालाच नव्हता. सहा महिन्यांपूर्वी शहरात भविकांची उसळलेली गर्दी पाहवून स्वतः आ. कल्याणशेट्टी मंदिरात तीन तास थांबून भक्तांची सुलभ दर्शनाचे व्यवस्था केले. त्याच दिवशी निर्धार केले आणि त्याप्रमाणे सुधारित आराखडा तयार करून तो मंजूर करून घेतले.

तीर्थक्षेत्र अक्कलकोट निवासी देशविदेशातून लाखो भाविक स्वामींच्या दर्शनासाठी येत असतात. त्यांना आजवर म्हणावं तसं सोयीसुविधा मिळत नव्हते. त्याचा आम्हाला खंत वाटत होते. सदर बाब आ. कल्याणशेट्टी यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पालकमंत्री याना लक्षात आणून देऊन विनंती केली, तेव्हा तात्काळ या आराखडा विषयाला गती मिळून आज अतिंम मंजुरी मिळाली आहे. यामाध्यामातून संपूर्ण मंदिर व त्याअनुषंगाने येणारे रस्ते वगैरे सर्व काही विकास होणार आहे. यामुळें आलेल्या भाविक दर्शन अंती समाधानाने परत जातील. एकंदरीत महाराष्ट्रातील प्रमुख तीर्थक्षेत्रा बरोबर अक्कलकोटचा सुद्धा विकास झालेले प्रत्यक्षात लवकरच पाहायला मिळणार आहे. राज्यातील टॉप फाईव्हमधील तीर्थक्षेत्र अक्कलकोट हे गेल्या अनेक वर्षापासून वंचित होते. आ. कल्याणशेट्टी यांच्या प्रयत्नाला यश आल्याने मतदारसंघासह स्वामी भाक्तातून समाधान व्यक्त होत आहे. सण, वार, उत्सव, दर गुरुवार, पोर्णिमा, एकादशी, संकष्टी चतुर्थी, स्वामींची प्रकटदिन व पुण्यातिथी, गुरुपोर्णिमा व नियमित स्वामी भक्तांची प्रचंड गर्दी होत आहे.

# संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी

जीवन गलांडे, निवासी उजिल्हाधिकारी प्रशांत आवटे यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

निरा स्नानावेळी होणाऱ्या गर्दीवर नियंत्रणासाठी उपाययोजना कराव्यात अशा सूचना करून पालकमंत्री श्री. देसाई म्हणाले, पालखी सोहळ्यात पिण्याच्या स्वच्छ पाण्याची व्यवस्था करण्यात यावी. त्यासाठी नदीमध्ये पुरेसा पाणीसाठा राहील याची दक्षता घ्यावी. पालखी मुक्कामाच्या ठिकाणी टँकरची व्यवस्था करावी. तात्पुरत्या शौचालयांची पुरेशी उपलब्धता करुन द्यावी. तसेच मुक्कामाच्या ठिकाणी विद्युत दिव्यांची चांगली व्यवस्था करावी. विद्युत पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी मनुष्यबळ तैनात ठेवावे. आरोग्य यंत्रणेने पुरेशा डॉक्टरांची व्यवस्था ठेऊन अत्यावश्यक औषधांचा पुरसा साठा ठेवावा. दर २ किमी अंतरावर रुग्णवाहिकांची व्यवस्था ठेवावी. सार्वजनिक बांधकाम विभागाने तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने मार्गावरील धोकादायक कठडे, पूल या ठिकाणी फलक लावावे व बॅरिकेटींग करावे. खड्डे बुजवावेत, रस्त्यांची कामे सुरु असलेल्या ठिकाणी असणाऱ्या धोकादायक खड्ड्यांच्या ठिकाणीही बॅरिकेटींग करावे. पोलीसांनी दरवर्षीप्रमाणे बंदोबस्ताचे नियोजन ठेवावे व वाहतूक व्यवस्था नियोजनाप्रमाणे करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी श्री. जयवंशी यांनी प्रशासनाच्या तयारीचा आढवा देताना सांगितले की, निरा स्नानाच्या ठिकाणी स्वच्छतागृह उभारणे काम पुर्ण झाले आहे. स्वच्छतेची कामे वेळेत पूर्ण करण्यात येत आहेत. पालखी तळाच्या ठिकाणी दर्शन रांगेसाठी बॅरकेटींग करण्यात येणार आहे, मदत व नियंत्रण कक्ष उभारण्यात येत असल्याचे सांगितले. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. खिलारी यांनी जिल्हा परिषदेकडील तयारीचा आढावा देताना पालखी मुक्कामाच्या ठिकाणी १ हजार तात्पुरते शौचालय उभारण्यात येणार आहेत, पुरेशा टँकरची व्यवस्थाही करण्यात येत असल्याचे सांगितले.

पोलीस अधिक्षक श्री. शेख यांनी बंदोबस्ताचा आढावा देताना, ९७० पोलीस अंमलदार व १८५ वाहतूक अंमलदार बंदोबस्तासाठी तैनात करण्यात येणार असल्याचे सांगितले. या बरोबरच राज्य राखीव पोलीस दलाची एक कंपनी, २५ पोलीस जीप, ३५ वॉकीटॉकी सेट यासह फायरब्रिगेड, राहुट्या व लागणारे सर्व साहित्य पुरविण्यात येत असल्याचे सांगितले.

# नागपुरातील चार मंदिरांमध्ये वस्त्र संहिता लागू

नागपूर : महाराष्ट्रातील मंदिरांवरुन सध्या अनेक वाद सुरु आहेत. काही दिवसांपूर्वी तुळजाभवानी मंदिरातील ड्रेसकोडच्या फलकावरुन मोठा वाद निर्माण झालेला. त्यातच आता महाराष्ट्र मंदिर महासंघाने एक घोषणा केली आहे.

नागपुरातील चार मंदिरांमध्ये वस्त्र संहिता म्हणजेच ड्रेस कोड लागू करण्यात आला आहे. महाराष्ट्रातील मंदिरांमध्ये वस्त्र संहिता लागू झाली पाहिजे, अशी मागणी महाराष्ट्र मंदिर महासंघाने केली आहे. पहिल्या महिन्यात नागपुरातील २५ तर राज्यभरातील ३००हून अधिक मंदिरांमध्ये ही वस्त्र संहिता लागू करण्याचे प्रयत्न करणार असल्याचंही महाराष्ट्र मंदिर महासंघाने म्हटले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# शासन आपल्या दारी योजनेतून जिल्हयातील एक लाख लाभार्थ्यांना लाभ देणार : मुख्यमंत्री



रत्नागिरी : शासन आपल्या दारी या योजनेच्या माध्यमातून रत्नागिरी जिल्ह्यातील किमान एक लाख लाभार्थ्यांना शासन योजनेचा लाभ प्रत्यक्ष स्वरूपात देण्यात येईल अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

रत्नागिरी जिल्ह्यातील शासन आपल्या दारी या लोकाभिमुख योजनेच्या शुभारंभाच्या वेळी ते बोलत होते.

यावेळी जिल्ह्याचे पालकमंत्री तथा उद्योग मंत्री उदय सामंत, बंदरे व खणीकर्म मंत्री दादाजी भुसे, उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई, आमदार रवींद्र फाटक, माजी आमदार सदानंद चव्हाण, विशेष पोलीस महानिरीक्षक प्रवीण पवार, जिल्हाधिकारी एम देवेंदर सिंह, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी किर्ती किरण पूजार, पोलीस अधीक्षक धनंजय कुलकर्णी आदि मान्यवरांसह व्यासपीठावर मोठया संख्येने लाभार्थी उपस्थित होते.मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, आपला उद्देश प्रामाणिक असला म्हणजे सर्व बाजूने लोक सोबत जोडले जातात . शासन आपल्या दारी हे अभियान देशात विक्रमी ठरेल आणि महाराष्ट्राचे उदाहरण देशासमोर राहील याची मला खात्री आहे. शासन आपल्या दारी हे एक क्रांतिकारी अभियान राज्यात सुरु झाले आहे.

१३ मे रोजी पाटण येथून संपूर्ण राज्यात या अभियानाची सुरुवात झाली. आज २५ मे म्हणजे केवळ बारा दिवसांत लाखो लाभार्थींची नोंद यात होत आहे हे विशेष आहे. शासन आपल्या दारी या अभियानाचे काम आम्ही कुठल्यातरी एका विभागावर सोपवून बसलेलो नाही. मुख्यमंत्री सचिवालयाचे यावर पूर्ण नियंत्रण आणि देखरेख आहे. माझे खासगी सचिव डॉ अमोल शिंदे हे स्वत: त्यांच्या टीमसह दिवसरात्र, चोवीस तास हे अभियान व्यवस्थित पार पडते आहे किंवा नाही याकडे लक्ष देत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळक, वीर सावरकर या महापुरुषांची भूमी असलेल्या रत्नागिरीत शासन आपल्या दारी हा उपक्रम यशस्वीरित्या राबविण्यात येत आहे, याचा आनंद आहे. या अभियानाचा फायदा अधिकाधिक लोकांना व्हावा म्हणून आपण आता माहिती तंत्रज्ञानाची मदत पण यात घेतो आहोत. महालाभार्थी या पोर्टलवर नोंदणी करून आपण योजनांचा लाभ घेऊ शकता. जिल्ह्यातील एमएससी आयटी केंद्रे, सीएससी केंद्रे तसेच कॉम्प्युटर ट्रेनिंग इन्स्टिट्यूट मधून तेथील स्वयंसेवकांची मदत घेऊन आपण नोंदणी करू शकता आणि योजनांचा लाभ घेऊ शकता. हे अभियान यशस्वी करण्यासाठी संपूर्ण प्रशासन यंत्रणा युद्धपातळीवर, फिल्डवर उतरली पाहिजे अशा सर्व यंत्रणांना सूचना होत्या. आज ग्राम सेवक, तलाठी, प्रांत अधिकारी स्वत: गावोगावी जाऊन नागरीकांना भेटत आहेत आणि लाभ देत आहेत, योजनांची माहिती देत आहेत. असे सांगून मुख्यमंत्री शिंदे यांनी प्रशासकीय यंत्रणेचे कौतुक केले.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, सातारा जिल्ह्यात तर या अभियानाला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला आहे. नगर जिल्हा तसेच ठाणे जिल्ह्याने सुद्धा यापासून प्रेरणा घेत या अभियानासाठी नोंदणी शिबिरे घेतली आहेत.

कल्याणमध्ये दीड लाख लाभार्थींना लाभ देत आहोत. गडचिरोलीसारख्या ठिकाणी दोन महिन्यात एक लाख लाभार्थींची नोंद झाली आहे. प्रत्येक जिल्ह्यात ७५ हजार , तालुक्यात १५ हजार आणि गावात किमान १०० लाभार्थींना योजनांचा लाभ मिळालाच पाहिजे यादृष्टीने सर्व तयारी झाली आहे.या अभियानासाठी १६ हजार योजना दूत नेमले आहेत. मुख्यमंत्री सचिवालयात जनकल्याण कक्ष सुरु करण्यात आला आहे.

प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा जनकल्याण कक्ष सुरु केले आहेत.गेल्या अकरा महिन्यात ३५ कॅबिनेट बैठका आणि त्यातून ३५० निर्णय हे सर्वसामान्य माणसांच्या हिताचे घेण्यात आले आहेत. सर्वसामान्य माणसांच्या आयुष्यात सुखी समाधानाचे दिवस यावेत, शासनाविषयी जनतेच्या मनात सकारात्मक भावना निर्माण व्हाव्यात हा या योजनेमागचा मुख्य उद्देश आहे. शासन आणि प्रशासन ही रथाची दोन चाके आहेत ही दोन्ही चाके विकास होण्यापासून कोणीही रोखू शकत नाही. एसटीच्या ५० टक्के सवलतीमुळे महिलांचा प्रवास वाढला वाढला आहे.एसटी त्यांना दिलेल्या सवलतीमुळे जेष्ठता प्रवासात वाढ झाली आहे.एम एम आर डी ए च्या धर्तीवर कोकण विकास क्षेत्र प्राधिकरणाच्या माध्यमातून कोकणाचा सर्वांगीण विकास साधण्यात येत आहे. कोकणात दहा हजार मल्टिनॅशनल कंपन्यांनी नोंदणी केली आहे. यातून राज्यातील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होईल. केंद्रशासन यासाठी मदत करत आहे. मुंबई-गोवा महामार्गाचे काम लवकरच पूर्ण होत आहे. मुंबई-सिंधुदुर्ग महामार्ग तयार होणार आहे, त्यामुळे प्रवासाचा वेळ वाचेल असेही त्यांनी सांगितले.

शासन आपल्या दारी या योजनेविषयी बोलताना पालकमंत्री उदय सामंत म्हणाले की, महाराष्ट्र राज्याच्या जडणघडणीतला हा पहिला कार्यक्रम आहे, ज्यात अधिकारी गावोगावी, घरोघरी जाऊन योजना लोकांपर्यंत पोहोचवत आहेत. शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा समाजातील प्रत्येक घटकांपर्यंत, प्रत्येक वर्गाला लाभ मिळाला पाहिजे यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील. रिक्षा चालक आणि मालक यांच्यासाठी महामंडळाची स्थापना करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे त्याची अंमलबजावणी लवकरात लवकर होईल. संजय गांधी निराधार योजना तसेच श्रावण बाळ योजना या योजनेपासून रत्नागिरी जिल्ह्यातील एकही लाभार्थी वंचित राहणार नाही अशी ग्वाही पालकमंत्री सामंत यांनी यावेळी दिलीशासन आपल्या दारी या योजनेच्या शुभारंभासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहिलेल्या दिव्यांग लाभार्थ्यांना दुचाकी व तीन चाकी गाड्यांचे वाटप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाषण जिल्हाधिकारी एम देवेंदर सिंह यांनी केले तर आभार जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री किर्ती किरण पूजार यांनी केले. तत्पूर्वी शासन आपल्या दारी योजनेच्या संकल्पनेची सविस्तर माहिती डॉ. अमोल शिंदे यांनी दिली.

### केंद्रिय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी घेतला राज्याच्या सामाजिक न्याय विभागाचा आढावा

## आंबेडकरी चळवळीतील महत्वपूर्ण सिद्धार्थ विहार वसतिगृह पुन्हा नव्याने सुसज्ज उभे करण्यासाठी ७८ कोटींच्या निधीची तरतूद

मुंबई : रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांच्या अध्यक्षतेत महाराष्ट्राच्या सामाजिक न्याय विभागाच्या कामकाजाचा आढावा घेणाऱ्या बैठकीचे आयोजन आज सह्याद्री अतिथीगृह मलबार हिल येथे करण्यात आले होते. यावेळी राज्याचे सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव सुमंत भांगे; सहसचिव दिनेश डिंगळे; आदी अनेक शासकीय अधिकारी मान्यवर उपस्थित होते. आंबेडकरी चळवळीच्या अनेक स्थित्यंतराचे ऐतिहासिक साक्षीदार असणाऱ्या वडाळा येथील सिद्धार्थ विहार वसतिगृहाचे आंबेडकरी चळवळीत महत्वाचे स्थान आहे. या ऐतिहसिक सिध्दार्थ विहार वसतिगृहाची पुन्हा अत्याधुनिक सुसज्ज उभारणी करण्यासाठी राज्याच्या सामाजिक न्याय विविद्यार्ट्झनभागातर्फे ७८ कोटी निधीची तरतूद करण्यात आली आहे. शिक्षण पूर्ण करुन नोकरी



मिळवून मुंबईत स्वतःचे घर घेण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या वसतिगृहातून बाहेर पडलेल्या माजी विद्यार्थ्यांसाठी या वसतीगृहात वर्किंग मेन हॉस्टेल म्हणून २० खोल्या आरक्षित ठेवण्यात येणार आहे. ९माजल्यांच्या या वसतिगृहात मेडिटेशन हॉल सुद्धा असेल.हे वसतिगृह येत्या ३ वर्षात उभे राहिल त्या दृष्टीने लवकरात लवकर बांधकाम सुरू करण्याचे निर्देश केंद्रियराज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी अधिकाऱ्यांना दिले.

महाराष्ट्र राज्याच्या सामाजिक न्याय मंत्रालयाला केंद्र सरकार तर्फे दरवर्षी ४ हजार १०१ कोटी चे बजेट मिळते आणि महाराष्ट्र राज्याचे १६ हजार ४९४ कोटी असे मिळून राज्याचे सामाजिक न्याय मंत्रालयाचे एकूण बजेट २० हजार ५९५ कोटी इतके आहे. बार्टी चे बजेट ३५० कोटी चे आहे. ज्या विद्यार्थ्यांना वसतीगृहात प्रवेश मिळत नाही अशा विद्यार्थ्यांना स्वाधार योजनेतून मदत देण्यासाठी १५० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. ज्येष्ठ नागरिकांना मासिक १ हजार मिळणारी पेन्शन मध्ये वाढ करून मासिक १ हजार ५०० देण्यात यावेत अशी सूचना ना.रामदास आठवले यांनी अधिकाऱ्यांना केली. राज्यात ४१ लाख ज्येष्ठ नागरिकांना पेन्शन मिळते.

बौद्धजन पंचायत समिती सभागृहाला मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेल्या २५ कोटी निधी मिळविण्यासाठी पाठपुरावा करून लवकर काम मार्गी लावण्याच्या सूचना ना.रामदास आठवले यांनी बैठकीत अधिकाऱ्यांना दिल्या.

यावेळी बौद्धजन पंचायत समिती चे गट प्रतिनिधी आणि रिपाइं चे मुंबई अध्यक्ष सिद्धार्थ कासारे; नागसेन कांबळे; लोजपा चे रवी गरुड; रिपाइं चे प्रकाश जाधव; रमेश गायकवाड; विनोद निकाळजे; सचिनभाई मोहिते; दयाळ बहादूर; अशोक भालेराव; चंद्रशेखर कांबळे; घनश्याम चिरणकर आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.

## शासन आल्या दारी या योजनेचे लाभ, लाभार्थ्यांनी घ्यावे : मंडळ अधिकारी भासगी


अक्कलकोट/प्रतिनिधीः सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी नागरिकांना सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागतात. अनेकदा नागरिकांना नाहक मनस्ताप सहन करावा लागतो.ही समस्या लक्षात घेऊन राज्य शासनाने जिल्हा अधिकारी कार्यालय सोलापूर,शासन आपल्या दारी,योजनेअंतर्गत योजना जनकल्याणकारी सर्वसामान्यांच्या दारीअभियान २९मे रोजी जेऊर जि.प.मराठी शाळा जेऊर येथे आयोजीत केले आहे.तरी लाभार्थ्यांनी या योजनेचे लाभ घ्यावे असे आवाहन मंडळ अधिकारी आर एस भासगी व तलाटी सचिन चव्हाण यांनी केले आहे.



शासन आपल्या दारी या योजनेच्या माध्यमातून नागरिकांची अडचणी सोडवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.नागरिकाना सरकारी योजनेसाठी लागणारी कागदपत्रे एकाच ठिकाणी सहज उपलब्ध करून देणे हा शासन आपल्या दारी या उपक्रमाचा प्राथमिक उद्देश आहे.घेण्यात येणाऱ्या महासंकल्प कार्यक्रमात जेऊरवाडी,जेऊर,कडबगाव,गौडगाव,

सेवालाल नगर,हंजगी,दोड्याल,हालचिंचोली, वसंतराव नाईक नगर,कोन्हाळी,कर्जाळ,बागेहळ्ळी या गावचा समावेश आहे.या अभियानात तालुक्यातील सर्व शासकीय अधिकारी, कर्मचारी उपस्थित राहणार आहे. कृषी यांत्रीकरण योजना,महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना,सीमांत शेतकरी गट बांधणी करणे,केंद्र पुरस्कृत-प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया योजना,पीक कर्ज योजना,मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजना, पशुसंवर्धन योजना,आप्पासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना,मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमात पंतप्रधान मंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, बेरोजगार उमेदवारांची नोंदणी करणे, व त्यांना नोकरी मिळण्यासाठी मार्गदर्शन व सहाय्यक करणे, प्रधानमंत्री स्वनिधी योजना, प्रधानमंत्री मुद्रा योजना, अशा अनेक विविध योजनांची माहिती देण्यात येणार आहे.

### शब्दकोडे क्र १०



आडवे शब्द १. चिंचा आल्यात पाडाला- या गीतातील पुढील ओळ ७. वैदूकडची औषधे १०. थेट, सरळ ११. हा खाताना घशात काटा अडकतो १२. मालाचा उठाव १४. मिळाला म्हणजे फायद्याचाच ठरला की! १५. जिजाबाईंचा पुत्र १७. जिरवण्याची ताकद २०. आवडता, प्रिय २१. नंतरचे नवराबायको २२. नमुनेदार २५. दक्षिणा वाटण्याची जागा २७. अति भयानक २९. रेशमाची गुंडाळी (अ.व.) ३०. 'कँटीन' असल्यावर हा कशाला? ३३. भलतेच विरुद्ध ३५. निर्बुद्ध, ढ ३६. दोनवेळा म्हटल्यास कटकट ३७. या काळातील घटना कुणाला कळल्यात! ३८. चकमक ४०. त्वरित, रातोरात ४१. रानरेडा ४२. नातवंडे म्हणजे दुधावरची --! ४३. दुलई ४४. उत्तराधिकारी ४७. फटाक्यात ठासून भरलेला मसाला ४८. काळ्या तोंडाचे माकड ५१. खोदकाम ५२. लिंबूपाणी ५४. न्याहरी-कधी उपासाची, कधी दिवाळीची! ५५. दुसऱ्यासाठी खिशाला चाट ५७. ओळख पटवणारे वैशिष्ट्य ५९. संपणे ६०. जन्मदाता, पिता ६१. माळी ६३. जगातील सगळ्यात घातक कीटक ६५. 'आ'काराची रेषा ६६. आमिषादाखल दाखवण्याचे कंदमूळ ६७. हे शहर काही आता पेन्शनरांचे राहिलेले नाही ६८. पंख ६९. किमान हालचाल ७१. वृद्ध ७२. '--सांगे ज्याला त्याला, वेड लागले राधेला' ७३. धमनी ७४. लोकरूढी, प्रथा ७७. बूड ७८. कोंब, अंकुर ७९. भिंतीवरून सरपटणारा प्राणी ८०. कबूतर ८१. दक्ष, दक्षतेचा इशारा

उभे शब्द १. जादूगाराचे कौशल्य-शर्विलकाच्याही हाती २. शेवट ३. हुबेहूब सोंग वठवणारा ४. घराची अब्रू घालवणारा ५. शंकराचे एक नाव ६. तिबेटी धर्मगुरु ७. पत्ता, शोध ८. तट्ट, फुगलेले ९. लक्ष पण अवधान नाही ११अ. गणेशमंदिरामुळे प्रसिद्ध असलेली पुण्यातील बाग १३. मजल, टप्पा १६. नियमित यात्रा करणारा १८. भरपूर कमाईचे 'जाडजूड; विशेषण १९. दरी २२. बांधकामासाठी कालवलेले मिश्रण २३. फुलांचे दागदागिने २४. टाळ्यांचा आवाज २६. सुकवलेली काळी द्राक्षे २८. रात्रभर ३१. लहान मूल ३२. आदित्यवार ३४. संत ज्ञानेश्वारांनी केलेली प्रार्थना ३५. बंदी, मज्जाव ३७. शिवशाहीचा ध्वज ३९. लिहिलेला लेख, संदेश इ. ४०. बांबूची मोठी टोपली, हारा ४५. एकरुप ४६. काम इ. लांबणे ४८. वारा, वायू, त्रास ४९. कच्चे लिखाण (इंग्रजी) ५०. वेदनेने ओरडणे, हळहळ व्यक्त करणे ५२. हुक्की, लहर ५३. अव्यवस्था, गोंधळ ५५. पाठशिवणीचा खेळ ५६. -- --- म्हणून लांडोरही नाचते (म्हण) ५७. हिंदीत रक्त ५८. चक्र ६०. पशू ६२. पुरुष ६४. राजाचा सैनिकी अधिकारी ६५. कान व डोळा यामधील भाग ६७. प्राचीन, जुने ७०. टक, दृष्टी ७५. कोरा ७६. त्याप्रमाणे

## संविधानाच्या जागरासाठी संविधान व्याख्यानमालेचे आयोजन

### रविवार २८ मे रोजी तिसरे पुष्प गुंफले जाणार

नागपूर : भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, 'लोकशाही म्हणजे लोकांच्या आर्थिक व सामाजिक जीवनात रक्तविहीन मार्गाने क्रांतिकारक बदल घडवून आणणारी शासनपद्धती'. तेव्हा, जबाबदार व जबाबदेही राज्यकारभार असला तरच लोककल्याण साधले जाऊ शकते, हा विचार जनमाणसांच्या मनामनात रुजवीणे देशहितासाठी आवश्यक असून देशाचे नागरिक म्हणून संविधानिक नीतिमूल्यांचा प्रचार-प्रसार करणे हे आपले कर्तव्य व जबाबदारी आहे. संविधानाच्या जागरासाठी संविधान फाऊंडेशन व इ.झेड. फाऊंडेशन नागपूरच्या वतीने येत्या रविवारी, २८ मे २०२३ रोजी संविधान व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले असून 'भारताचे संविधान व वर्तमान वास्तव' या विषयावर ज्येष्ठ लेखक, विचारवंत व सामाजिक कार्यकर्ते प्रा. जावेद पाशा कुरैशी हे तिसरे पुष्प गुंफणार आहेत.

शंकरनगर चौक, नागपूरातील श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृहात येत्या रविवारी सायं. ५.०० वा. आयोजित संविधान व्याख्यानमालेचे अध्यक्षस्थान माजी सनदी अधिकारी व संविधान फाऊंडेशनचे संस्थापक इ. झेड. खोब्रागडे हे भूषवतील. संविधानातील मौलिक तत्वे, संरक्षण, आरक्षण व सामाजिक-आर्थिक विकासाचे मार्गदर्शक तत्वे जनमाणसांपर्यंत आणि तेही शालेय जीवनापासूनच मुला-मुलींच्या माध्यमातून घरोघरी पोहोचविण्याचा उपक्रम, शाळांमधून दररोज संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन सुरू करण्याची व '२६ नोव्हेंबर-संविधान दिन' ही संकल्पना २००५ मध्ये इ. झेड. खोब्रागडे यांनी नागपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी असताना 'संविधान ओळख' उपक्रमाच्या रूपात देशात पहिल्यांदाच नागपूर जिल्ह्यात राबविली. २००५ मध्ये सुरू केलेला उपक्रम २०१५ पासून देशभर विस्तारित झाला असून २६ नोव्हेंबर हा दिवस 'संविधान दिन' म्हणून आता देशभर साजरा केला जातो.

संविधान फाऊंडेशन, नागपूर ही संविधानाच्या जाणीव-जागृतीसाठी सामाजिक बांधिलकीने कार्य करणारी सामाजिक संघटना आहे. संविधानाच्या जागृतीसाठी व्याख्याने, कार्यशाळा, चर्चासत्र, परिसंवाद, संविधान साहित्य संमेलन, संविधान परिषद, संविधान जागृती परीक्षा, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, वॉक फॉर संविधान, संविधानाची शाळा, संविधान मित्र, संविधान दूत इत्यादी कार्यक्रमांच्या आयोजनासह संविधानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संविधान फाऊंडेशनच्या वतीने सोशल एडव्होकेसी व शासनाकडे सातत्याने पत्रव्यवहार केला जातो. प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'नागपूर' या क्रांतिभूमीतून इ. झेड. खोब्रागडे यांनी सुरू केलेल्या 'संविधान ओळख' या नावीन्यपूर्ण उपक्रमांचे डॉक्युमेंटेशन तसेच 'आपले संविधान' पुस्तकाचे प्रकाशन संविधान फाऊंडेशनने केले आहे. संविधानाच्या जागरासाठी हे लेखन, प्रकाशन व आयोजन आहे.

२०१९ मध्ये प्रजासत्ताक दिनाच्या पर्वावर सुरू झालेल्या 'संविधान व्याख्यानमाला' या उपक्रमाचे येत्या रविवारी, २८ मे २०२३ रोजी सायं. ५.०० वा. तिसरे पुष्प गुंफले जाणार असून संविधान जागराच्या या कार्यक्रमाला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या लोकचळवळीस सहकार्य करावे असे आवाहन संविधान फाऊंडेशनच्या रेखा खोब्रागडे, डॉ. महेंद्रकुमार मेश्राम, दीपक निरंजन, शिरीष कांबळे, नेहा खोब्रागडे, विजय बेले व दिगंबर गोंडाणे यांनी केले आहे.

## मोहोळमधील प्रश्नाबाबत उपमुख्यमंत्र्यांना निवेदन

मोहोळ/प्रतिनिधी : सोलापूर जिल्ह्याच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या मोहोळ तालुक्यामध्ये अपघाताचे प्रमाण वाढले असून लोकसंख्येच्या आधारे नागरिकांना योग्य त्या आरोग्य सुविधा उपलब्ध होण्यासाठी शहरामधील ग्रामीण रुग्णालय येथे १०० खाटांचे सर्व सोयींनीयुक्त उपजिल्हा रुग्णालय करावे, यासह शहरासाठी नवीन पाणीपुरवठा योजना सुरू करावी, अशी मागणी भाजपचे शहराध्यक्ष सुशील क्षीरसागर यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली. उपमुख्यमंत्री फडणवीस हे गुरुवारी सोलापूर दौऱ्यावर असताना सुशील क्षीरसागर यांनी बाजार समितीचे माजी संचालक अंकुश आवताडे यांच्यासमवेत शहर व तालुक्यातील प्रश्नांवर निवेदन देऊन चर्चा केली. येथील ग्रामीण रुग्णालयात अत्यावश्यक प्रसंगी रुग्णांना उपचार मिळत नसल्याने बऱ्याचदा त्यांना सोलापूर येथे उपचारासाठी पाठवावे लागते. योग्यवेळी उपचाराअभावी कित्येक रुग्णांना आपले प्राणही गमवावे लागतात. त्यामुळे या सर्व बाबींचा विचार करून मोहोळ येथे उपजिल्हा रुग्णालय झाले तर रुग्णांना सर्व सोयीसुविधा वेळेत मिळतील. याच हेतूने सुशील क्षीरसागर यांनी फडणवीस यांच्याकडे सदर मागणी केली.

# स्वेरीचे माजी विद्यार्थी सुरज खिलारे यांचे युपीएससी मध्ये यश

पंढरपूर/प्रतिनिधीःगोपाळपूर ता.पंढरपूर येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित अभियांत्रिकी महाविद्यालयातील मेकॅनिकल इंजिनिअरिंग या विभागातून उत्तीर्ण झालेले माजी विद्यार्थी सुरज संभाजी खिलारे यांनी केंद्रीय लोकसेवा आयोग





अर्थात यु.पी.एस.सी. मार्फत घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेत उज्वल यश संपादन केले असून त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. सुरज खिलारे यांच्या यशामुळे स्वेरीने स्पर्धा परीक्षेतील यशाची परंपरा कायम राखली आहे. भक्कम पाया, योग्य मार्गदर्शन आणि अफाट परिश्रम या त्रिसूत्री च्या जोरावर सुरज खिलारे यांनी स्वेरीच्या इतिहासात आपली नोंद केली आहे.

खिलारे यांनी प्राथमिक व माध्यमिक शिक्षण जयसिंगपुरच्या लक्ष्मीनारायण मालू या हायस्कूलमधून पूर्ण केले तर जयसिंगपुर कॉलेजमधून बारावी सायन्सचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर पुढे अभियांत्रिकीला कुठे प्रवेश घ्यायचा हा विचार करत असताना पंढरपूरच्या स्वेरीने त्यांचे लक्ष वेधले. २००९ साली स्वेरीमध्ये प्रथम वर्ष अभियांत्रिकीच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग या विभागात प्रवेश मिळवला. संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे सरांच्या मार्गदर्शनाखाली व इतर प्राध्यापकांच्या सहकार्याने कठोर परिश्रमाला सुरवात केली.

सुरज यांचे वडील संभाजी खिलारे हे कोल्हापूरमधील आदर्शगाव मधून मुख्याध्यापक म्हणून सेवानिवृत्त झाले आहेत तर त्यांच्या आई सौ. सुवर्णा खिलारे ह्या गृहिणी आहेत. सुरज यांना एक बहीण असून त्या 'इन्फोसिस' मध्ये नोकरी करत आहेत. यूपीएससी परीक्षेची निवड यादी नुकतीच जाहीर झाली असून ट्रेनिंग नंतर सुरज हे प्रशासकीय सेवेत रुजू होणार आहेत. यापूर्वी यूपीएससी या स्पर्धा परीक्षेत स्वेरीचे माजी विद्यार्थी संतोष माळी व सुनील आगवणे यांनी देखील यश मिळविले आहे. संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख, सर्व विश्वस्त व पदाधिकारी, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम.पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, सर्व अधिष्ठाता, सर्व विभागप्रमुख, सर्व प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांनी सुरज खिलारे यांचे अभिनंदन केले आहे.

# सहकार शिरोमणी कारखान्यात परिवर्तनाचा एल्गार वाडीकुरोलीत सभासदांचा मोठा प्रतिसाद

## ज्या पद्धतीने श्री विठ्ठल कारखाना चालवला त्याच पद्धतीने सहकार शिरोमणी कारखाना यशस्वी चालून सभासद, कामगारांना न्याय देणार

## सहकार शिरोमणीची थकीत ऊस बिल दिल्याशिवाय कारखाना सुरू करणार नाही.

पंढरपूर/प्रतिनिधीः सहकार शिरोमणी वसंतराव सहकारी साखर कारखान्याचे पंचवार्षिक निवडणुकीचे बिगुल वाजले असून सत्ताधारी पॅनल च्या विरोधात श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांचा पॅनल उभा असल्याने काल स्व.वसंतराव दादा काळे यांच्या वाडीकुरोली गावातून पहिली विचार विनिमय बैठक घेण्यात आली.



स्व.वसंतदादा काळे यांच्या पुतळ्यास पुष्प हार अर्पण करून माय माऊलींनी औक्षण करून अभिजीत पाटील यांचे हलगीच्या जल्लोषात वाडीकुरोली ग्रामस्थ सभासदांनी स्वागत केले.इथं विकासाचा एक वेगळाच पॅटर्न बनलाय! तो म्हणजे 'कारखाना चालवणारा माणूस' इथं बंद असलेला साखर कारखाना कसा चांगला चालवला जाईल आणि शेतकरी, कामगारांना प्रामाणिकपणे न्याय देता येईल हाच विचार येथील शेतकरी सभासद व सर्वसामान्य नागरिक करत आहेत.त्याच धर्तीवर आपण श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीमध्ये मायबाप सभासदांनी निवडून दिल्यानंतर कारखाना चालू करायच्या अगोदर थकीत ऊस बील देण्याचे काम देखील आपण प्रामाणिकपणे केले आहे.

श्री विठ्ठल परिवारातील सहकार शिरोमणी हा एक भाग असून त्या सभासदाला न्याय देण्याची भूमिका या ठिकाणी विठ्ठल प्रमाणेच राहील असे अभिजीत पाटील म्हणाले.

श्री विठ्ठल प्रमाणेच सर्व गोष्टी सहकार शिरोमणी कारखान्याच्या देखील प्रामुख्याने करण्यात येतील थकीत बिले, कर्मचाऱ्यांचे राहिलेले थकीत पगार, तसेच वाहतूक ठेकेदाराचे बिल व इतर देणी देण्याची भूमिका या ठिकाणी श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी दिली.अभिजीत पाटील गटामध्ये तरुणांची फौज आणि सर्वसामान्य सभासदांना विश्वासात घेऊन वाडीकुरोली येथील विकास सोसायटीचे सदस्य विठ्ठल निवृत्ती काळे तसेच बंडू लक्ष्मण साळुंखे (खेडभाळवणी), संतोष भालचंद्र गाजरे, बापूनाना वामन गाजरे, नबीलाल शेख, विठ्ठल गाजरे (शेळवे) तसेच एकलासपूर मा.सरपंच बाळासाहेब शिवाजी ताड, संपत झांबरे (पळशी) या सह सोमनाथ गोरे(आढीव) यांनी अभिजीत पाटलांच्या कार्यशैलीवर व कार्यावर विश्वास ठेवून गटांमध्ये प्रवेश केला यामुळे भालके व काळे गटाला मोठा धक्का मिळाला आहे.यावेळी स्वेरीचे सचिव बी.पी.रोंगे सर, श्री विठ्ठल कारखान्याच्या व्हा. चेअरमन प्रेमलता रोंगे, यशवंत पाटील, संचालक धनंजय काळे, माजी नगराध्यक्ष सुभाष भोसले विष्णू भाऊ बागल,शेतकरी संघटनेचे नेते सचिन पाटील रामचंद्र वाघ, बाबासाहेब काळे, अर्जुन काळे, दादा पाटील,

प्रमोद काळे, विठ्ठल काळे, मोहन काळे, पांडुरंग काळे, नितीन काळे, सचिन काळे, मारुती काळे, समाधान पाटील, चंद्रकांत काळे, अविनाश काळे यासह सभासद, शेतकरी बांधवासह, विविध संघटनेचे पदाधिकारी, तरुण वडीलधारी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते..

# पंढरपूर तालुका काँग्रेसची कार्यकारणी लवकरच जाहीर करणार : हनुमंत मोरे



**पंढरपूर तालुका काँग्रेसमध्ये अनेक वर्षानंतर खांदेपालट झाली असून, मा. तालुकाध्यक्ष काँग्रेस नेते प्रकाश पाटील, हे स्वतःहून पायउतार झाले आहेत. त्यानंतर तालुकाध्यक्षपदाची धुरा कोणाच्या खांद्यावर येते, याची उत्सुकता पंढरपूर तालुकावासीयांना होती. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, प्रदेश अध्यक्ष नाना पटोले यांच्या नेतृत्वाखाली, पंढरपूर तालुक्यातील गावागावापर्यंत काँग्रेसची ध्येयधोरणे पोहोचविणार असल्याचे मत हनुमंत मोरे यांनी यावेळी व्यक्त केले.**

पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर तालुक्यात काँग्रेस पक्षाला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी, निष्ठावान आणि होतकरू तरुणांची तालुका कार्यकारणी लवकरच जाहीर करण्यात येईल, ही कार्यकारणी आगामी दिवसात काँग्रेसला मोठी उभारी देण्याचे कार्य पार पाडणार असल्याचे मत पंढरपूर तालुका काँग्रेसचे नूतन अध्यक्ष हनुमंत मोरे यांनी व्यक्त केले. ते पंढरपूर येथे पत्रकार परिषदेत बोलत होते.

मागील काही दिवसांपासून काँग्रेसने देशात मोठी उभारी घेतली आहे. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्ष पुन्हा एकदा मजबूत होऊ पाहत आहे. सोलापूर जिल्ह्यातील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे, प्रदेश कार्याध्यक्ष आ. प्रणिती शिंदे, जिल्हाध्यक्ष धवलसिंह मोहिते पाटील, पंढरपूर तालुक्यातील काँग्रेस नेते प्रकाश पाटील, ज्येष्ठ नेत्या सुनेत्राताई पवार , यांच्या मार्गदर्शनाखाली यापुढील काळात आपण काम करणार असून, पंढरपूर तालुक्यातील कार्यकारणी निर्माण करण्याचे काम हाती घेतले आहे. नव्या आणि जुन्या कार्यकर्त्यांचा मेळ घालण्याचे काम केले जाणार असून, लवकरच ही कार्यकारणी जाहीर केली जाईल. याच कार्यकारणीच्या माध्यमातून पंढरपूर तालुक्यात काँग्रेसला आशादायक दिवस येतील, यावर आपला ठाम विश्वास आहे. पुढील दिवसात होणाऱ्या पंढरपूर नगरपरिषद, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका पार पडणार आहेत. या निवडणुकांमध्येही काँग्रेस आपले अस्तित्व नक्कीच दाखवणार आहे, असा आशावाद हनुमंत मोरे यांनी यावेळी व्यक्त केला.

हनुमंत मोरे हे पंढरपूर तालुक्यातील भोसे गावचे रहिवाशी असून, बुधवारी त्यांना तालुकाध्यक्षपदाचे अधिकृत नियुक्तीपत्र देण्यात आले आहे. गेल्या वीस वर्षापासून ते काँग्रेसचे निष्ठावंत कार्यकर्ते राहिले आहेत. समाजसेवक म्हणून त्यांनी केलेले काम तालुक्यास परिचित आहे. मा.तालुकाध्यक्ष प्रकाश पाटील यांचे वारसदार म्हणून, त्यांनी मागील दिवसात तालुक्यातील काँग्रेसचे काम पाहिले होते. याचाच फायदा त्यांना झाला असून, त्यांना तालुकाध्यक्षपदाची संधी देण्यात आली आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, जिल्हाध्यक्ष धवलसिंह मोहिते पाटील, यांच्या हस्ते त्यांना नियुक्तिपत्र देण्यात आले आहे. मुंबईहून परत येताच त्यांनी पंढरपूरमध्ये पत्रकार परिषद घेऊन , त्यांची दिशा स्पष्ट केली आहे.

## वागदरी येथे शासन आपल्या दारी उपक्रम साजरा

# जनतेने विविध शासकीय योजने लाभ घ्यावे : संतोष कांबळे

अक्कलकोट /प्रतिनिधीः मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यात 'शासन आपल्या दारी' हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. वागदरी ता अक्कलकोट येथे रविकिरण वरनाळे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम घेण्यात आले



यावेळी प्रतिमा पूजन वागदरी सरपंच श्रीकांत भैरामडगी यांच्या सह मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले यावेळी बोलताना नायब तहसीलदार संतोष कांबळे म्हणाले की, शासन आपल्या दारी या उपक्रमांतर्गत विविध शासनाच्या योजनाच्या माहिती जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी शासनाचे काम चालू असून लोकांना घर बसल्या विविध दाखला, व योजनेचे माहिती देण्यासाठी हा उपक्रम आयोजित करण्यात आला, समाजातील प्रत्येक घटकाला शासकीय योजनांचा लाभ मिळावा यासाठी राबविण्यात येणाऱ्या या अभियानाचा सर्व नागरिकांनी जरूर लाभ घ्यावे असे आवाहन केले यावेळी पंचायत समितीचे विस्तार अधिकारी संजय पाटील यांनी पंचायत समिती,जिल्हा परिषद आणि ग्रामपंचायत स्तरावरील विविध योजना माहिती दिले व ग्रामपंचायत विविध दाखले ऑनलाईन कसे काढायचं यांची माहिती दिले

डॉ बाबासाहेब आंबेडकर स्वावलंबी योजना अंतर्गत मागासवर्गीय नवीन विहिर, एम आर इ जी एस अंतर्गत जनरल विहिर, कृषी विभागामार्फत राबविण्यात येणारे विविध योजनांचे माहिती सांगितले

यावेळी नायब तहसीलदार श्री संतोष कांबळे, सरपंच श्रीकांत भैरामडगी,उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, पंचायत समिती विस्तार अधिकारी संजय पाटील, रमेश सावंत, पत्रकार चंद्रशेखर भांगे, कृषी मंडळ अधिकारी शिवानंद देगीले, प्रदीप पाटील , शिवराज (मंत्री ) पोमाजी,सह कृषी अधिकारी शिरगापुरे, ग्रामसेवक विक्रम घाटे, राजू कणमुसे, मोहन ढोपरे, तलाठी सतीश जगताप , ग्रामपंचायत सदस्य शिवानंद घोळसगाव, सायाबु गायकवाड, श्रीकांत इंडे, महा ई सेवा केंद्र प्रमुख बसवराज कलशेट्टी, ग्रामपंचायत व वीज वितरण कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# नाना पटोले यांना हटविण्यासाठी बड्या नेत्यांचा दिल्लीत तळ

नवी दिल्ली : कर्नाटक विधानसभा निवडणुकीतील विजयामुळे महाराष्ट्र काँग्रेसमध्येही उत्साह संचारलेला असतानाच पुन्हा एकदा अंतर्गत मतभेद चव्हाट्यावर आले आहेत. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या कार्यशैलीवर नाराज असलेल्या एका शिष्टमंडळाने दिल्लीत दाखल होत पक्षश्रेष्ठींकडे आपले गाऱ्हाणे मांडल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. हाराष्ट्रातील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार हे या शिष्टमंडळाचे नेतृत्व करत असल्याचे समजते. पटोलेंच्या गच्छंतीसाठी शिष्टमंडळासह ते दिल्लीत तळ ठोकून बसले असल्याची सूत्रांची माहिती आहे.वडेट्टीवार समर्थक देवतळे यांना पटोले यांनी चंद्रपूर काँग्रेस जिल्हाध्यक्षपदावरून काढून टाकले. तेव्हापासूनच वडेट्टीवार हे पटोलेंवर नाराज असल्याचे बोलले जात होते.

# रिपाइं च्या शिर्डी महाअधिवेशनास हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे

## सैदप्पा झळकी यांचे आवाहन

अक्कलकोट/प्रतिनिधीः रिपब्लिकन पार्टी आफ इंडिया(आठवले गट) चे महाराष्ट्र प्रदेशचे राज्य महाअधिवेशन येत्या २८में रोजी शिर्डी येथे होणार असून त्यात अक्कलकोट तालुक्यातून जास्तीत जास्त हजारोंच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आव्हान रिपब्लिकन पक्षाचे सोलापूर चे जिल्हा चिटणीस सैदप्पा झळकी यांनी केली आहे.



सोलापूरचे सुपुत्र लोकनेते माजी मंत्री राजाभाऊ सरवदे यांचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष निवड झाल्यावर हे पहिले अधिवेशन असल्याने संपूर्ण देश भरातील रिपब्लिकन पक्षाचे नेते व कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित राहणार आहे. तरी सोलापूर जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी, राजाभाऊ सरवदे प्रेमी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहून महाअधिवेशन यशस्वी करण्यात यावे. रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजीक न्याय राज्यमंत्री ना. डां. रामदास आठवले यांच्या आदेशाने, प्रदेश अध्यक्ष तथा माजी मंत्री राजाभाऊ सरवदे यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या महाअधिवेशनास आपल्या अक्कलकोट तालुक्याचे अध्यक्ष अविनाश मडिखांबे यांच्या नेतृत्वात बहुसंख्येने उपस्थित राहण्यांचे आव्हान या वेळी सैदप्पा झळकी यांनी केली आहे.

दि. २८ में रोजी शिर्डी येथे सां. ५ वाजता कांदा मार्केट समोरील मैदानात होणाऱ्या या महाअधिवेशनास महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माजी मुख्यमंत्री तथा सध्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा भारताचे केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास जी आठवले, राज्याचे महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील,रिपाइंचे राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश जी महातेकर, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे हे तर उपस्थित राहणार असून याबरोबर देशातील अनेक मान्यवर तथा महाराष्ट्रातील पश्चिम विदर्भ, पूर्व विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, कोकण मुंबई आणी ठाणे प्रदेश या भागातून लाखोंच्या संख्येने कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित राहण्याची माहिती सोलापूर जिल्ह्याचे चिटणीस सैदप्पा झळकी यांनी दिली आहे.

# मनसे नेते अमित राजसाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड प्रणव भोपळे यांना आमंत्रित



कोल्हापूर/नामदेव निर्मळेः वडणगे जिल्हा कोल्हापूर येथील गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड होल्डर प्रणव अशोक भोपळे यांना मनसे नेते मा. अमितजी राजसाहेब ठाकरे यांनी बोलवून त्यांचा सत्कार करण्यात आला. प्रणवला फुटबॉल स्किल दाखवण्याची संधी दिली. व त्याचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस प्रोत्साहन दिले.जगात भारी आम्ही कोल्हापुरी या पावलावर पाऊल ठेवत प्रणव भोपळे यांनी फुटबॉल गुडघ्यावर ठेवून एक रेकॉर्ड केले होते. आतापर्यंत यांची फ्रीस्टाइल फुटबॉल या खेळामध्ये तीन वेळा गिनीज बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नाव नोंद झाले आहे. याची दखल अनेक पत्रकार ,मीडिया, यांनी घेतली होती. या कलेची दखल त्यांची अमितजी राजसाहेब ठाकरे यांनी सुद्धा घेतली व त्यांचा सन्मान करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.यांना मोलाचे योगदान मा.निशांत गायकवाड साहेब यांचे लाभले. चर्चेचा विषय ठरला व सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे.

# एक दिवशीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन नरहरीजी झिरवाळ यांच्या शुभ हस्ते होणार

नाशिक :पुष्परत्न बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, पुष्परत्न साहित्य समूहाच्या प्रथम वर्धापन दिन सोहळ्यानिमित्त एकदिवशीय मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन रविवार ४ जून २०२३ रोजी पुष्परत्न बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, पुष्परत्न साहित्य समूह नाशिक आयोजित एकदिवसीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन माननीय नरहरीजी झिरवाळ यांच्या शुभहस्ते होणार तसेच या संमेलनाचे संमेलनाध्यक्ष मा. उत्तम कांबळे( ज्येष्ठ साहित्यिक,संपादक,कवी) उपस्थित राहणार असून प्रमुख पाहुणे सुप्रसिद्ध मराठी अभिनेत्री मा.मेघा घाडगे, मा.बाबासाहेब सौदागर( १२० पेक्षा जास्त मराठी चित्रपट पटकथा लेखक, अभिनेते),डॉ.चेतना सोनकांबळे



(आंतरविद्याशाखा, अधिष्ठाता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ. संभाजी नगर) ,मा. डॉ. प्रशांत पाटील( प्राचार्य,शाहू महाराज पॉलिटेक्निकल इंजिनिअरिंग कॉलेज नाशिक) असे विविध साहित्य चित्रपट कलावंत शिक्षण क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार असून त्यांच्या शुभ हस्ते साहित्य क्षेत्रात दैदिप्यमान कामगिरी करणाऱ्या साहित्यिकांचा सन्मान सोहळा ही आयोजित केला असून सुप्रसिद्ध अभिनेते मा.बाबासाहेब सौदागर यांचा संपूर्ण जगभर गाजत असलेला कार्यक्रम #माझ्या गाण्याची जन्म कथा हा मुलाखत पर कार्यक्रम ठेवला असून त्यानंतर महाराष्ट्रातील विविध ठिकाणाहून येणाऱ्या कवी कवयित्रींचे राज्यस्तरीय कवी संमेलनाचे ही आयोजन केले आहे.

जास्तीत जास्त कवी, कवयित्री, साहित्यिक, प्रकाशक, वाचकांनी या कार्यक्रमास उपस्थित रहावे. आपला आयोजक तथा पुष्परत्न साहित्यसमूह अध्यक्ष प्रा. डॉ.आनंद रत्नाकर आहिरे नाशिक(७३८ ७३८ ६४९२)